सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, अमरावती
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
"Towards Global Technological Excellence"
फोन: ०७२१-२५३१९३० फॅक्स: ०७२१-२५३१९३१
वेबसाइट: www.gcoea.ac.in इमेल: principal@gcoea.ac.in

क्र. शाअमअ / छायाप्रत / संगणक छपाई केंद्र /आस्था२ क/२०२५ 321
दिनांक: 14/01/2025

## जाहिरात

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती या संस्थेतील छायाप्रत / संगणक छपाई सुविधा केंद्र चालविण्या साठी वर्ष २०२५-२६ करीता विद्यार्थी सहकारी भांडार छायाप्रत / संगणक छपाई दरपत्रक पंजीबध्द / नोंदणीकृत सेवाधारका कडून विहित नमुण्यात दरपत्रक मागविण्यात येत आहे.

निविदा आवेदन पत्र महाविद्यालयाच्या ग्राहक भांडारातून कार्यालयीन वेळेत दि. २०/०१/२०२५ ते दि.२४/०१/२०२५ पर्यंत रु. १०००/- रोख भरून प्राप्त करून घ्यावे. संपूर्ण भरलेले दरपत्रक दि. २७/०१/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० पर्यंत सादर करण्यात यावे.

आवेदन पत्रासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावी लागतील. अन्यथा कागदपत्रां अभावी आवेदन पत्र रद्द करण्यात येईल. विलंबाने प्राप्त होणारे आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अधिकची माहिती करीता महाविद्यालयाचे संकेतस्थळ **www.gcoea.ac.in** वर पाहावे.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

प्रतिलिपी: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

१. डाटा सेंटर, शा. अभि. महा. अमरावती. यांना माहिती करीता सदरची जाहिरात अधिकचे माहिती करीता महाविद्यालयाच्या संकेतस्थळ **www.gcoea.ac.in** वर प्रसिध्द करावे.
२. सुचना फलक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

छायाप्रत / संगणक छपाई केंद्र चालविण्यासाठी द्यावयाचा आवेदनपत्राचा नमुना

(सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून चालविण्याची परवानगी देण्यात येईल.)

१. आवेदनपत्र भरणाऱ्याचे नावः ...............................................................................

२. राहण्याचा पत्ताः ...........................................................................................

३. दुरध्वनी क्रमांकः .........................................................................................

४. प्रतिष्ठाणाचे नावः .........................................................................................

५. प्रतिष्ठाणाचा पत्ताः.........................................................................................

अ] १) शॉप ॲक्ट परवाना मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वे संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र

२) अमरावती महानगरपालिका परवाना ( अनुज्ञाप्ती क्रमांक प्रमाणपत्र ) [असल्यास]

३) संबंधित व्यवसायाचा अनुभव ( सोबत प्रमाणपत्र जोडावे ) [असल्यास]

४) निविदा शुल्क भरणा केल्याची पावती (छांयाकीत पत्र) सोबत जोडावी

५)सुरक्षा / अनामत ठेव रक्कम (Work order) मिळाल्यानंतर भरावी लागणार.

६) अर्जदार विरुद्ध पोलीस तक्रार नसल्याचे तसेच काळे यादीत अंतर्भूत नसल्याचे स्वयंघोषित पत्र सोबत जोडावे

७) अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषित १०० रू. स्टॅमवर (Work order) मिळाण्यानंतर सादर करावे.

८) निविदा दोन प्रपत्रामध्ये A व B पाकीट या स्वरूपात A मध्ये आवश्यक कागदपत्रे व B मध्ये फक्त दरपत्रक भरून दोनही पाकीट शीलबंद करून ते पाकीट C मध्ये भरून त्यावर (कोटेशन-छायाप्रत / संगणक छपाई केंद्र) असे वरच्या बाजुस लिहुन ते एक पाकीट त्यावर संस्थेचे नाव व पत्ता व आपले प्रतिष्ठानाचे नाव लिहून शीलबंद कार्यालयात सादर करावे.

९) निविदा धारकाने निविदे सोबत जोडलेल्या प्रत्येक पानावर स्वतःची सही करणे आवश्यक आहे.

ब]   १) सर्वप्रथम कागदपत्राची पडताळणी केली जाईल निवेदेत नमुद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केले आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याची आढळल्यास अशी निवीदा अपात्र ठवविण्यात येईल निविदा दरपत्रक उघडण्यापुर्वी कागदपत्रे पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या निवीदा धारकाची दर पत्र नियुक्त समीतीमार्फत अर्थ छाननी करण्यात येईल ज्याची एकत्रीत दर हा कमी (L1) असेल त्या निविदाचा विचार केल्या जाईल निवीदा धारकाचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलवले जाईल व त्याद्वारे अंतीम निर्णय घेतल जाईल चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार छायाप्रत / संगणक छपाई केंद्र नियुक्त समीतीस राहील.

२) संबधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे तसेच कागदपत्राचे लीफाफे उघडल्यानंतर नियुक्त समीतीने मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. निवीदा भरण्यापुर्वी निवीदा धारकाने छायाप्रत / संगणक छपाई केंद्राची पाहणी करावी. निवीदा धारकास निवीदा भरताना काही अडचण असल्यास किंवा काही बाबत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास संस्थेची संपर्क साधावा.

३) कोणत्याही क्षणी कुठलेही कारण न देता निवीदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहतील.

अर्जदाराची नाव व सही

# छायाप्रत / संगणक छपाई सुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या अटी व शर्ती

१. मी महाविद्यालय परीसरात ठरवुन दिलेल्या जागेवर छायाप्रत्र / संगणक छपाई, बांधणी इ. उपलब्ध करून देईल व कमीत कमी वेळेत उत्तम सेवा उपलब्ध करुन देईल व त्या करीता लागणारी यंत्र सामुग्री उदा. दोन संगणक संच, रंगीत प्रिंटर, स्कॅनर, दोन झेरॉक्स मशीन, बाईडिंग मशीन उपलब्ध करून देईल.

२. सदर जागेत आवश्यक ग्रील, केबिन, शटरसह फर्निचर स्वखर्चाने बसवुन घेईल व करार संपल्यावर परत घेवुन जाईल.

३. महाविद्यालयातील विद्यार्थी ग्राहक भांडारत विकल्या जाणाऱ्या वस्तु/ स्टेशनरी/ फॉर्म इ. मी माझ्या दुकानात विकणार नाही किंवा सदर साहित्याचे झेरॉक्स / प्रिंट आऊट काढुन देणार नाही.

४. या दुकानाचा फक्त शैक्षणिक कामासाठीच मी वापर करील व सायबर कॅफे सारख्या कामाकरीता वापर करणार नाही.

५. महाविद्यालय परीसरामध्ये माझ्यामुळे कायदा व सुव्यवस्था, शांतता किंवा महाविद्यालयाच्या नियमांचा भंग होणार नाही याची मी दक्षता घेईल व तसे काही माझ्या कडुन झाल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार राहील.

६. मी सुविधा पुरवठादार हा परवानाधारक (दुकानाचा परवाना) आहे. दुकानाच्या सुरक्षिततेची जबाबदारी माझी असेल व आवश्यकते नूसार विमा माझे खर्चाने काढुन घेईल.

७. झेरॉक्स काढण्यासाठी वापरण्यात येणार कागद (किमान ७० जी. एस. एम.) उत्तम प्रतीचा वापरीन.

८. संबंधित जागेचा किंवा दुकानाचा जनरल स्टोअर सारखा वापर करणार नाही.

९. मा. प्रार्चायानी वेळोवेळी दिलेल्या दिशा निर्देशांचे पालन करणे माझ्यावर बंधनकारक राहील.

१०. सदर जागेचे भाडे रु. २०००/- (अक्षरी रू. दोन हजार फक्त ) प्रती माह राहील.

११. सुविधा पुरवठादार यांनी अनामत / सुरक्षा ठेव म्हणुन रक्कम रु. ५०००/- जमा करणे आवश्यक आहे.

१२. सुविधा पुरवठादार म्हणुनचा कालावधी हा फक्त ११ महिण्यांसाठी असेल. त्यानंतर गुणवत्ता तपासुन कालावधी वाढवुन देण्याचा अधिकार मा. प्राचार्यांचा राहील.

१३. अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यास कंत्राटदार सर्वस्वी जबाबदार राहील व उपरोक्त करार संपृष्टात आणण्यात येईल.

१४. दुकानात बालकामगार नियुक्ती करता येणार नाही व कर्मचाऱ्यांना कीमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील तसेच नियुक्त करण्यात येणारे कर्मचारी प्रामाणिक, विश्वासु, शारीरीक दृष्टा सक्षम व अनुभवी असल्याची तसेच त्यांच्या विरूध्द कोणत्याही स्वरूपाच्या गुन्हाची नोंद पोलीस स्टेशनला असणार नाही. सर्व कामगारांची माहिती रंगीत छायाचित्रासह संस्थेत जमा करील . तसेच त्यांचे फोटो असलेले ओळखपत्राच्या प्रती जमा करील. नेमणुक करण्यात आलेल्या कामागारांनी मद्यपान न करणे, नशा न करणे व गैरवर्तणुक न करणे याकरीता बांधील राहील. अशा अथवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करणे या करीता बांधील राहील. अशा अथवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास दुकान बंद करण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना राहील.

१५. नियुक्त कामगार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणासही दुकाणात थांबु देणार नाही व असे आढळल्यास ते गैरवर्तन समजण्यात येईल.

१६. दुकानातील कामगारास काम करीत असतांना जिवितास काही हानी/ इजा/ दुखापत/ नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास संस्था कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कामगारांच्या निष्काळजीपणा मुळे दुकानातील वस्तु तथा साहित्याचे नुकसान झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्याची भरपाई देण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

१७. या कराराव्दारे सोपविण्यात आलेले छायाप्रत / संगणक छपाई केंद्र चालकास इतर कोणत्याही कंत्राटदाराकडे अथवा एजन्सीकडे हस्तांतरीत करता येणार नाही व सोपविता येणार नाही सदरील बाब निर्देशनास आल्यास सेवा बंद करण्याचे पुर्ण अधिकार मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती यांना राहतील.

१८. छायाप्रत / संगणक छपाई केंद्र याची वेळ सकाळी ७.०० ते सा. ७.०० वाजेपर्यंत अशी राहील.

# कंत्राटदाराने द्यावयाचे हमीपत्र

मी________________________________________________पदनाम____________________

वय________________________राहणार____________________________________________

संस्थेचे नाव__________________________________________________________________________

पत्ता________________________________________________________________________________

खालीलप्रमाणे प्रतिज्ञा करतो की...

१. माझ्या एजन्सी / कंपनीचे कोणत्याही व्यक्ती सोबत कोणत्याही प्रकारची भागीदारी / शेअर किंवा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष संबंध नाही.

२. माझ्या एजन्सी / कंपनी दिवाळखोर म्हणुन घोषित झालेला नाही.

३. माझ्या एजन्सी / कंपनीने अनुचित कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

४. माझ्या एजन्सी / कंपनीने कोणतेही गैरकृत्य करून किंवा नैतिक अध:पतनाचे कोणतेही कृत्य केलेले नाही.

५. माझ्या एजन्सी / कंपनीने कोणतेही गुन्हेगारी कृत्य केलेले नाही. तसेच कंपनी विरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

६. माझ्या एजन्सी / कंपनीने आयकर / विक्रीकर व फेरा इ. कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. त्याबाबत माझ्या एजन्सी / कंपनी विरुध्द दावा दाखल झालेला नाही.

७. माझ्या एजन्सी / कंपनीला शासकीय / स्थानिक संस्था यांनी काळ्या यादीत टाकलेले नाही.

८. माझ्या एजन्सी/कंपनीला______________________________________________संस्थेने ____/____/______ ते ___/____/_______या कालावधीसाठी काळ्या यादीत टाकले होते. सदर कालावधी संपला असल्याने माझ्या कंपनी निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहे.

९. माझ्या एजन्सी / कंपनीला सेवेच्या स्वरुप व व्याप्ती दिल्याप्रमाणे तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे सेवेचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास माझी एजन्सी / कंपनी सदर ठिकाणी पुरविलेल्या आवश्यक सेवेसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

१०. पात्रतेबाबतचे दाखल केलेले कागदपत्रे सर्व खरी आहेत. त्यात काही फसवेगिरी आढळुन आल्यास किंवा तसे करार काळात आढळुन आल्यास माझी एनन्सी / कंपनी त्यासाठी जबाबदार राहु व अपात्र ठरु माझी एनन्सी / कंपनी अशा परीस्थितीत कोणतीही नोटीस न देता पुरविण्यात आलेली सेवा रद्द करण्याचा अधिकार मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यायल अमरावती यांना राहील तसेच मी कार्यालयाकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यायल अमरावती यांना अधिकार राहील व ते मला मान्य राहील.

**ठिकाण:** **निविदाधारकाचे नाव व सही**______________________

**दिनांक:** **पत्ता:**___________________________________

**दुरध्वनी / मोबाईल क्रमांक:**______________________

# Price List

| Sr. No. | Details | Quantity | Rate per side ( To be Quoted) |
|---|---|---|---|
| 01 | A4 size Xerox one side | 1 to 50 Copies | |
| | | Above 50 Copies | |
| 02 | A4 size Xerox both sided | 1 to 50 Copies | |
| | | Above 50 Copies | |
| 03 | A4 Size Project report computer print Plain Paper both side | All Copies | |
| 04 | A4 Size Project report computer print | Plain Paper one side | |
| 05 | A4 Size Project report computer print | Bond Paper one side | |
| 06 | A4 Size Project report computer print | Bond Paper both side | |
| 07 | A3 size print /Xerox | Plain Paper | |
| 08 | A4 size colour print /Xerox | Text | |
| 09 | A4 size colour print /Xerox | Graphics/ Photos | |
| 10 | Only Print | Per pages | |
| 11 | Spiral Binding | Up to 60 pages | |
| | | Next Every 20 Pages | |
| 12 | Hard Binding | Rexine with embossing | |
| 13 | Form filling and printing | Online chalan/ payment | |
| 14 | A4 Size Page Lamination | Per Page | |